# ७. दया - धम्मो

'दया-धम्मो' या पाठातील गाथा 'कुमारपाल-प्रतिबोध' या प्राकृत कथासंग्रहातून घेतल्या आहेत. आचार्य सोमप्रभ या ग्रंथाचे लेखक आहेत. आ. हेमचंद्रांनी राजा कुमारपाल याला जैन धर्माचा उपदेश दिला म्हणून या कथासंग्रहाचे नाव 'कुमारपाल-प्रतिबोध' असे आहे.

यादव कुलातील राजा समुद्रविजय यांच्या पुत्राचे नाव कुमार अरिष्टनेमी होते. कुमार अरिष्टनेमीचे लग्न उग्रसेन राजाची पुत्री राजिमती हिच्याशी ठरले. कुमार विवाह करण्यासाठी थाटामाटात निघाला व उग्रसेन राजाच्या महालाजवळ पोहोचला. त्यावेळी पशूंचे करूण स्वर ऐकून त्याने पाहिले, की अनेक पशू तिथे बांधून ठेवलेले आहेत. चौकशी केल्यावर त्याला समजले, की लग्नात आलेल्या लोकांना, राजा उग्रसेन त्या बिचाऱ्या प्राण्यांना मारून, भोजन देणार आहे. 'माझ्या एकट्याच्या विवाहानिमित्ताने हजारो निरपराध प्राण्यांची हिंसा होणार आहे' यासाठी कुमाराने धिक्कार नोंदविला. त्याने सारथ्याला रथ मागे फिरवण्यास सांगितले व वनात जाऊन संन्यास घेतला. त्यानंतर स्वतःला कमनशिबी समजून राजीमतीने अरिष्टनेमींप्रमाणे संन्यास घेतला.

आजही समाजात देव-देवतांना प्रसन्न करण्यासाठी निरपराध प्राण्यांचा वध केला जातो. प्राण्यांचा नाश म्हणजे पर्यावरणाच्या घटकांचा विनाश आहे. प्राणी सुद्धा एक प्रकारची नैसर्गिक संपत्ती आहे. त्यांचे रक्षण करणे म्हणजे पर्यावरणाचे रक्षण तर आहेच; परंतु पर्यायाने स्वतःचेही रक्षण आहे. सर्वप्राणीमात्रांवर दयाभाव ठेवणे कसे आवश्यक आहे हे या काव्यातून स्पष्ट केले आहे.

बारवईए पुरिए समुद्दविजयाइणो दस-दसारा।
आसि असि-भिण्ण-अरिणो जाअव-कुल-विंझ-गिरि-करिणो।।१।।

तत्थ दसमो दसारो वसुदेवो, तस्स णंदणो कण्हो।
सो आसि तत्थ राआ ति-खंड-महि-मंडलस्स पहू।।२।।

पुत्तो समुद्दविजयस्स आसि कुमारो अरिट्ठणेमि त्ति।
बावीसइमो तित्थंकरो त्ति चारित्त-कअ-चित्तो।।३।।

करि-तुरअ-रहारूढेहिं कण्ह-पमुहेहिं पवर-सयणेहिं।
सहिओ समागओ उग्गसेण-णिव-मंदिरासण्णं।।४।।

सोऊण करुण-सद्दं जाव दिट्ठिं देइ तत्थ ता णियइ।
रुद्धे पसु-सस-सुअर-उरब्भ-हरिणाइणो जीवे।।५।।

तस्सद्द-जग्गिय-दओ किमिमे रुद्ध त्ति पुच्छए कुमरो।
तो सारहिणा भणियं, 'कुमार, सुण कारणं एत्थ।।६।।

हणिउं इमे वराए इमाण मंसेण भोअणं दाही।
तुज्झ विवाहे वेवाहियाण सिरि-उग्गसेण-णिवो'।।७।।

तो भणिअं कुमरेणं, 'धिद्धी! परिणअणं एरिसं जत्थ।
भव-कारागार-पवेस-कारणं कीरए पावं'।।८।।

भोगे भुयंग-भोगे व्व भीसणे दूरओ लहुं मुत्तुं।
संसार-सागरुत्तरण-संकमं संजमं काहं।।९।।

तो वज्जरियं इमिणा इत्तो सारहि! रहं णिअत्तेसु।
चालेसु मंदिरं पइ तेणावि तहेव तं विहिअं।।१०।।



दट्ठुं कुमरमुविंतं रविं व णलिणी विसट्ट-मुह-कमला।
जा आसि पुव्वमिण्हिं तु पिच्छिउं तं णियत्तं सा।।११।।

राइमई खेअ-परा परसु-णिअत्त व्व कप्प-रुक्ख-लआ।
मुच्छा-णिमीलिअच्छी सहस त्ति महीअले पडिआ।।१२।।

सत्थी-कआ सहीहिं बाह-जलाविल-लोअणा भणइ।
‘हा! णाह! किमवरद्धं मए जमेवं णिअत्तो सि।।१३।।

जइ वि तुमए विमुक्का अहं अहण्णा तहा वि मह णाह!।
तुह चलण च्चिअ सरणं’ त्ति णिच्छिउं सा ठिआ बाला।।४।।

दाऊण वच्छरं दाणमुज्जयंते पवण्ण-चारित्तो।
चउ-पण्णास-दिणंते लहइ पहू केवलणाणं।।१५।।

तो णअरायर-गामाइएसु पडिबोहिऊण भविअ-जणं।
सो वास-सहस्साऊ, इहेव अअले गओ मुक्खं।।१६।।

---

## सद्दत्था

**बारवईए** – द्वारकेमध्ये

**दस दसारा** – दहा दशार्ह, दहा जणांकडून सन्मानित असे दहा, म्हणजेच पूज्य

**णंदणो** – मुलगा, पुत्र

**ति-खंड-महि-मंडलस्स-पहू** – तीन खंडाने युक्त पृथ्वीमंडलाचा प्रभू किंवा स्वामी

**कण्ह-पमुहेहिं** – कृष्ण इत्यादि प्रमुखांनी

**सहिओ** – बरोबर

**रुद्धे** – अडकवलेले (पिंजऱ्यात)

**तस्सद्द-जग्गिय-दओ** – त्यांच्या आवाजाने दया उत्पन्न झालेला

**सारहिणा** – सारथ्याने

**दाही** – देणार आहे

**भव-कारागार** – संसाररूपी तुरुंग

**भुयंग-भोगे** – सर्पाचा फणा

**संकमं** – पलिकडे जाणे

**णिअत्तेसु** – माघारी घे

**कुमरमुविंतं** – कुमरं + उविंतं – कुमाराला येताना

**खेअ-परा** – अत्यंत दु:खी, खेदित

**असि-भिण्ण-अरिणो** – तलवारीने शत्रूंचा नाश करणारा, पराक्रमी

**कण्हो** – कृष्ण

**करि-तुरय-रहारूढेहिं** – (रह + आरूढेहिं) हत्ती, घोडे, रथावर चढलेल्यांच्या (सह)

**पवर-सयणेहीं** – विशिष्ट नातेवाइकांनी

**णिव-मंदिरासण्णं** – मंदिर + आसण्णं राजाच्या महालाजवळ

**किमिमे** – किं + इमे – यांना कशाला

**वराए** – बिचाऱ्यांना

**वेवाहियाण** – विवाहात आलेल्या लोकांना

**भोगे** – इंद्रियसुख

**सागरुत्तरण** – सागर + उत्तरण – समुद्र पार करणे

**वज्जरियं** – बोलावणे

**चालेसु** – चालव

**विसट्ट** – विकसित

**परसु-णिअत्त** – तलवारीने (कापलेली) वेगळी केलेली

**सहस** – अचानक

**मुच्छ–णिमीलियच्छी –** णिमीलिय + अच्छी – मूर्छेने डोळे बंद झालेली

**सत्थी–कया –** आश्वस्त केली

**किमवरद्धं –** किं + अवरद्धं – काय अपराध केला

**विमुक्का –** त्याग केली गेलेली

**चलण –** चरण, पाय

**वच्छरं –** संवत्सर, वर्ष

**पवण्ण–चारित्तो –** संयम किंवा संन्यास घेतलेला

**अअले –** पर्वतावर

**बाह–जलाविल–लोयणा –** अश्रुपूर्ण डोळे असलेली

**जमेव –** जं + एव – याप्रमाणे

**अहण्णा –** अधन्या, कमनशिबी

**णिच्छिउं –** निश्चय करून

**दाणमुज्जयंते –** दाणं + उज्जयंते – उज्जयंत (गिरनार) पर्वतावर

## सज्झाओ

१ **अरिष्टनेमींचे चरित्र लिहा.**

२ **खालील विषयांवर संक्षिप्त टीपा द्या.**

अ) अरिष्टनेमी व कृष्ण यांचे नाते.

ब) अरिष्टनेमींचा विवाह.

क) अरिष्टनेमींचे वैराग्य.

ड) राजिमतीची मूर्च्छा.

इ) राजिमतीची दीक्षा.

३ **ससंदर्भ स्पष्टीकरण द्या.**

१) किमिमे रुद्ध त्ति।

२) हणिउं इमे वराए इमाण मंसेण भोयणं दाही।

३) 'धिद्धी! परिणअणं एरिसं जत्थ।

४) हा! णाह! किमवरद्धं मए जमेव णिअत्तो सि।

४ **वर्णविषयक बदल स्पष्ट करा.**

बारवई, कण्ह, सिरि, वच्छर, अहण्ण, मुच्छा, कप्परुक्ख, जायव, चलण.

५ **रूपे ओळखा.**

तस्स, सोऊण, सारहिणा, काहं, गओ, भणइ, कण्हो, विजयस्स.

६ **संधी सोडवा.**

मंदिरासण्णं, किमिमे, कुमरमुविंतं, णिमीलियच्छी, जलाविल, दिणंते, इहेव.

❋❋❋